**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 26.10.2025** **वार- रविवार**

---

**<u>पंतप्रधान नरेंद्र मोदी</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. नुकताच झालेला दीपोत्सव, छटपूजा या सणांच्या काळात स्वदेशी वस्तूंची खरेदी, संस्कृत भाषेचं महत्त्व, तिच्या संवर्धनासाठी होत असलेले प्रयत्न, याबरोबरच येत्या 31 ऑक्टोबरला लोहपुरुष सरदार पटेल यांच्या जयंतीदिनाचं स्मरण पंतप्रधानांनी केलं, यानिमित्त देशभरात आयोजित होणाऱ्या ‘रन फॉर युनिटी’मध्ये सहभागी होण्याचं आवाहनही त्यांनी केलं.

पंतप्रधानांच्या या मन की बात कार्यक्रमाच्या 127व्या भागाचं प्रसारण आज पुण्यात बाणेर इथं करण्यात आलं होतं. केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक यावेळी उपस्थित होते. पंतप्रधानांनी त्यांच्या प्रेरणादायी संवादात भारतीय संस्कृतीच्या गौरवशाली परंपरा आणि लोकभावनांशी निगडित अनेक महत्त्वपूर्ण विषयांचा उल्लेख केल्याचं मोहोळ म्हणाले.

**<u>विज्ञानरत्न पुरस्कार</u>**

ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉक्टर जयंत नारळीकर यांना मरणोत्तर 'विज्ञानरत्न' सन्मान जाहीर झाला आहे. यंदा एकंदर 24 शास्त्रज्ञांना राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार जाहीर झाले आहेत, यात मुंबईचे डॉक्टर अनिरुद्ध पंडित यांना विज्ञान श्री पुरस्कार, तर पुण्याचे प्राध्यापक डॉक्टर सुहृद मोरे आणि बंगळुरूच्या डॉक्टर दीपा आगाशे यांना 'विज्ञान युवा–शांती स्वरूप भटनागर पुरस्कार' जाहीर झाला आहे.

**छटपूजा**

सूर्य देवतेची उपासना करण्याचा उत्सव म्हणजेच छट पूजेचा उत्सव उत्तर भारतात मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो, त्याचप्रमाणे पिंपरी चिंचवड शहरातही हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. श्रीविश्व श्रीराम सेनेच्या वतीने मोशी इथल्या इंद्रायणी नदीच्या घाटावर उद्या संध्याकाळी 6 वाजता, भव्य गंगा आरती करून छट पूजा साजरी होणार आहे.  यानिमित्त इंद्रायणीच्या घाटावर काल स्वच्छता अभियान राबवण्यात आलं.

**पुणेमनपा**

पुणे महापालिकेच्या घनकचरा विभागाने विमाननगर आणि भवानी पेठ परिसरात राबवलेल्या यांत्रिकीकृत कचरा संकलन प्रयोगाचे चांगले परिणाम दिसून आले आहेत. या प्रयोगामुळे घरोघरी जाऊन सर्व कचरा गोळा केला जात आहे. त्यामुळे हा प्रयोग टप्प्याटप्प्याने संपुर्ण शहरात राबवण्यात येणार असल्याचं उपायुक्त आणि घनकचरा व्यवस्थापन विभागाचे प्रमुख संदीप कदम यांनी सांगितलं आहे.

**उल्हास पवार**

संगीत रंगभूमीवरील ज्येष्ठ गायिका अभिनेत्री दिप्ती भोगले यांनी लिहिलेल्या संगीत नादलुब्ध मी, संगीत चंद्रमाधवी आणि संगीत स्वरविभ्रम या तीन पुस्तकांचं प्रकाशन ज्येष्ठ नेते उल्हास पवार यांच्या हस्ते आज पुण्यात झालं. संगीत रंगभूमीची वाटचाल प्रेरणादायी आहे; शिलेदार कुटुंबियांनी नव्या पिढीवर संगीत नाटकाचे संस्कार रुजविण्यासाठी निष्काम कर्मयोग्याप्रमाणे कार्य केलं आहे, असे गौरवोद्गार उल्हास पवार यांनी यावेळी काढले.

**वसतीगृह उद्घाटन**

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या पुण्यातील मुलींसाठीच्या नूतन वसतिगृहाचं उद्घाटन अमेरिकास्थित उद्योजक दांपत्य विभावरी आणि गिरीश गायतोंडे यांच्या हस्ते नुकतंच झालं. स्त्री, या एकाच नात्याचा विचार करून मुलींनी सदैव एकमेकींच्या साह्यासाठी

तत्पर असलं  पाहिजे; असं मत गायतोंडे यांनी यावेळी व्यक्त केलं. या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार होते.

**शीतगृह**

शेतकऱ्यांनी शीतगृहांसारखा पर्याय स्वीकारून, योग्य वेळी शेतमालाची विक्री केली पाहिजे; त्यासाठी गावोगावी शीतगृहांची उभारणी झाली पाहिजे, असं प्रतिपादन कृषी संचालक विनयकुमार औटी यांनी आज पुण्यात केलं. औटी यांची कृषी संचालकपदी निवड झाल्याबद्दल जुन्नरच्या गणेश सहकारी दूध व्यावसायिक संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला; या सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी राबवल्या जाणाऱ्या योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचं कृषि विभागाचं उद्दिष्ट आहे, असंही औटी म्हणाले.

**एलपीजी**

सेवा शुल्कात वाढ करण्याच्या मागणीसाठी एलपीजी वितरकांनी देशव्यापी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. 'एलपीजी डिस्ट्रिब्युटर्स असोसिएशन ऑफ इंडिया' या संघटनेच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या आंदोलनात पुण्यातील 450 गॅस वितरक सहभागी होणार आहेत. संघटनेच्या राष्ट्रीय सचिव श्वेता पाटील यांनी ही माहिती दिली आहे. 29 ऑक्टोबरला मशाल मोर्चा काढून निषेध नोंदवला जाईल; त्यानंतर 6 नोव्हेंबरला 'नो मनी, नो इंडेंट' या मोहिमेतंर्गत कोणतीही रक्कम जमा केली जाणार नाही. त्यानंतरही सरकारने मागण्या मान्य केल्या नाहीत, तर सर्व वितरक संपावर जातील, असा इशारा संघटनेनं दिला आहे.

**बाजार समिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून सुमारे नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आवक स्थिर असली तरी मागणी वाढल्याने कांदा, बटाटा, आलं आणि गाजर यांचे भाव वाढले आहे. पालेभाज्यांचे दरही गेल्या आठवड्याप्रमाणेच टिकून आहेत. आवक घटल्याने डाळिंबाचे भाव वधारले आहेत. दिवाळीमध्ये फुल बाजारात फुलांचे दर उच्चांक पातळीवर गेले होते;

मात्र आता अत्यल्प मागणी असल्याने जवळपास सर्वच फुलांच्या भावात निम्म्याने घट झाली आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज हलका पाऊस पडला. कमाल तापमान 30 तर किमान तापमान 21 पूर्णांक 1 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही हलक्या स्वरूपाच्या पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**